83 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन 26 - 28 मार्च 2010 रोजी पुणे येथे यशस्वी झाले. महाराष्ट्र साहित्य परिषद व पुण्यभूषण या आयोजकांचे अभिनंदन. काही मुद्दे विचारार्थ.

(1) संमेलन हायटेक होते. हजारो लोक प्रत्यक्ष उपस्थित होते. संगणकावर व टीव्हीवर असंख्य लोकानी ते पाहिले व ऐकले.

(2) काही कार्यक्रमांची वेळापत्रके योग्य संभाळली गेली नाहीत. कित्येक वक्त्यांची भाषणे माहितीपूर्ण व मनोरंजक होती.

(3) या संमेलनाध्यक्षपदाची सूत्रे कुणी द्यावीत असा प्रश्न आला. अगोदरच्या संमेलनाच्या अध्यक्षानी सूत्रप्रदान करण्याची प्रथा होती. 82 व्या संमेलनाला अध्यक्ष नव्हते (त्याची कारणे येथे नकोत). सूत्रप्रदानप्रथा यंदा रद्द झाली. मूळातच विसंगत होती. कायम संस्थेचे अध्यक्ष बदलताना सूत्रप्रदान सुसंगत असते.

(4) मागील संमेलन ते प्रस्तुत संमेलन या काळामध्ये निधन पावलेले लेखक, कलाकार, समाजसेवक यांसाठी शोकाचा ठराव होतो. काही व्यक्तींचे उल्लेख झाले नाहीत ही टीका झाली. ठराव मांडताना काळजी घ्यावी व एक सोय जाहीर करावी की अमुक तारखेपर्यंत उणीवा कळवल्यास संमेलनदप्तरात नोंद होईल.

(5) वक्त्यांस सांगावे की " मित्रानो " एवढे म्हणावे व सभेपुढे लगेच विचार मांडावेत. व्यासपीठावरील अन्य लोकांचे उल्लेख (मान्यवर, नामदार वगैरे विशेषणांसह) करून वेळ घालवू नये.

(6) व्यासपीठावर बोलावून मराठी विज्ञान परिषदेचे MNG व

समर्थ मराठी संस्थेचे एक कार्यकर्ते यांचा सत्कार केला गेला. असे अन्य संस्थांबाबत दर संमेलनात व्हावे. मविपचा 1974 मध्ये उल्लेख (www.mngogate.com/m02.pdf) पान 2 पहा.

(7) संमेलनासाठी तंबाखू (तसेच दारू) व्यसनाच्या उद्योजकांची देणगी घेणे चूक आहे, अशी पक्की भूमिका टीकाकारानी घेतली. या उद्योगात हजारो कामगारांना वेतन मिळते. त्यांचे पुनर्वसन अन्यत्र होणार असेल तरच उद्योग संपेल. बँक देणगी देते. ती देणगी पवित्र वाटते. परंतु बँकेने तंबाखू उद्योगास कर्ज देऊन (व्यसने वाढवून) व्याज घेणे शक्य. 20 लाखाची तंबाखु देणगी नाकारली. लगेच अन्य 1 कोटीच्या देणग्या मिळाल्या. वाहवा.

-- म. ना. गोगटे Apr 2010 (www.mngogate.com)